श्रीकृष्ण जीवनाचा नेमका अर्थ

- साने गुरूजी

---

अयोध्येचा राजा श्रीराम व द्वारकापती श्रीकृष्णाने भारतीयांच्या ह्रदयात अढळ स्थान मिळवले आहे. राम-कृष्ण नावात भारतीय संस्कृती सामावून गेली आहे. येथे राम-कृष्णाच्या चरित्रास वेगळ्या दृष्टीकोनातून पहाण्याचा प्रयत्न आहे. गोकुळात प्रेम व स्नेहाचे वातावरण प्रस्थापित करणारा, जरासंध व शिशुपालाचा नाश करणारा, द्रौपदीची विटंबना होत असतांना रक्षणासाठी धावून येणारा किवा प्रेमाने अर्जुनाचे घोडे हाकणाऱ्या कृष्णाचे वर्णन येथे येणार नाही. कृष्णाकडे येथे व्यक्ती म्हणून नाही तर प्रतीक म्हणून पाहण्याचा प्रयत्न आहे.

## गोकुळात श्रीकृष्ण-



गोकुळाचा अर्थ व्यापक आहे. गो म्हणजे इंद्रिये. हिरवे गवत बघून गाय जशी धाव घेते त्याचप्रमाणे इंद्रिय विषयांमागे धावत असतात. आपले जीवनही गोकुळच आहे. कुल म्हणजे समुदाय. इंद्रियांचा समूह म्हणजेच गोकुळ. याप्रमाणे आपणा प्रत्येकाकडे गोकुळ आहे. मात्र, या गोकुळात आनंद नव्हता. सुख-शांती नव्हती, संगीत नव्हते, सुव्यवस्था नव्हती, गीत-नृत्य नव्हते. जीवनरूपी गोकुळातील सुर हरवले होते. आकर्षण इंद्रियांना आपल्याकडे खेचत असते. याप्रमाणेच मनाच्याही विविध प्रवृत्ती आहेत. त्यामध्ये एकवाक्यता नसते. गोकुळात द्वेषाग्नी धगधगत असतो. अंतकरणाच्या यमुनेत अहंकाराचा कालिया नाग घर करून बसत असतो. अघासुर, बकासूर या गोकुळात येण्यासाठी तत्पर असतात. आपल्या ह्रदयात नेहमी हलकल्लोळ माजलेला असतो. त्यामुळे रात्रंदिवस ह्रदयमंथन सुरू असते. समुद्र मंथनाची कथा आपण ऐकलीच असेल. समुद्र मंथन म्हणजे ह्रदयरूपी समुद्राचे मंथन. वासना व विकाराच्या लहरी या समुद्रात नेहमी आदळत असतात. या मंथनातून अनेकविध वस्तू बाहेर येत असतात. कधी लक्ष्मी बाहेर येऊन धनलाभ देते, कधी अप्सरा मोहित करतात, कधी मद्याचे घडे समोर येतात. कधी प्रेमाचा चंद्र उगवतो तर कधी द्वेष-हलाहल उत्पन्न होते. अमृतप्राप्तीपर्यंत म्हणजे खरे समाधान-शांतता लाभेपर्यंत हे मंथन सुरूच राहणार.

आपल्या ह्रदयात सतत अशांततेची ज्वाला धगधगत असते. द्वेष व मत्सराने तुडूंब भरलेल्या गोकुळात श्रीकृष्ण जन्म घेत असतो. कृष्णाने नंद-यशोदाच्या पोटी जन्म घेतला. नंदाचा अर्थ आहे आनंद. यशोदेचा अर्थ आहे यश देणारी सतवृत्ती. आनंदासाठी व्याकुळ असलेला जीवात्मा व जीवात्म्यास सहायता करणारी सत्प्रवृत्ती यातूनच श्रीकृष्ण जन्म घेत असतो. राम-श्रीकृष्णाच्या जन्माचा शोध घेतल्यास आपणांस खरा अर्थबोध झाल्याशिवाय राहणार नाही. रामचंद्राचा जन्म भर दुपारी झाला. पाय जळतील एवढे तापले होते. शोधून सावली सापडत नव्हती. विश्रांती घेण्यासाठीही कोठे जागा नव्हती. आत्मा व्याकुळ होतो, ह्रदय दुःखाने पिळवटून निघते, त्यावेळेसच रामचंद्र जन्म घेत असतात.

> हे श्रीकृष्णा ! तू म्हणशील तसेच करणार, तुझ्या आदेशाप्रमाणेच चालणार, बोलणार, व्यवहार करणार. तुम्ही आमचे स्वामी आहात.’

श्रीकृष्णाने कधी जन्म घेतला? रामांचा जन्म भरदुपारी झाला तर श्रीकृष्णाचा मध्यरात्री. मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट व ढगांच्या गडगडाटात, यमुना दुधडी भरून वाहत असताना श्रीकृष्ण जन्म झाला. जीवनात कृष्णपक्षाचा अंधार दाटला असताना, निराशेचे डोह भरले असताना, डोळ्यांमधून आसवांच्या धारा वाहत असताना, सर्व मार्ग खुंटले असताना, हृदयाची यमुना दुथडी भरून वाहू लागते. यावेळी श्रीकृष्ण जन्म घेतो. श्रीकृष्णाने आपल्या सैरभैर जीवनास स्थिर केले. कवी रवींद्र यांनी लिहिल्याप्रमाणे 'संपूर्ण दिवस सतारीत तार घालण्यात गेला. मात्र, अजूनपर्यंत तार लागली नाही. त्यामुळे संगीताचे सूर उमटलेच नाहीत. 'आम्हा सर्वांची हीच स्थिती आहे. जीवनाच्या सतारीचे तार अजूनही जुळलेले नाहीत. जीवनाची सतार सात तारांची नसून हजारो तारांची आहे. या असंख्य तारांमधून केव्हा मधूर झंकार उमटेल?

प्रत्येक प्रवृत्ती सुंदर स्वरूप धारण करून जीवात्म्यास मोहीत करण्याचा प्रयत्न करत असते. श्रीकृष्ण गोपींच्या बाह्य स्वरूपाने प्रभावित न होता गोपींना त्यांने खरे स्वरूप दाखवून देतो. यावेळी दृष्टी प्रवृत्ती लज्जित होऊन श्रीकृष्णास म्हणते, हे श्रीकृष्णा ! तू म्हणशील तसेच करणार, तुझ्या आदेशाप्रमाणेच चालणार, बोलणार, व्यवहार करणार. तुम्ही आमचे स्वामी आहात.' सर्व इंद्रिये व प्रवृत्तींना महान ध्येयप्राप्तीसाठी प्रेरीत करून जीवनात स्थिरत्व प्राप्त करणेच जीवनातील मुख्य कर्म असते. भ्रमर कमळाकडे जाणार, पतंग प्रकाशाकडे झेपावणार. तद्वतच आपल्या प्रवृत्ती, शक्तींना एखाद्या ध्येयाप्रती वाहून घेणे आवश्यक असते. श्रीकृष्ण हे काम करतो. तो सर्व प्रवृत्तींना एकत्रित करून ध्येयप्राप्तीचा मार्ग दाखवतो. यामुळे अशांतता संपुष्टात येते. मनाच्या गाभाऱ्यात एकच स्वर उमटतो. कृष्ण. कृष्ण. कृष्ण.

आपल्याला सगळ्या लीलांमध्ये,
भोगामध्ये रमलेला कान्हा मात्र 'मी
कर्मयोगी आहे'. असे सांगतानाही
आपणाला आश्चर्य वाटत नाही.
कारण तो एक पूर्णपुरुष आहे.

अनादी काळापासून हिंदू धर्मात राम आणि कृष्णाची पूजा केली जाते आहे. त्यातही रामचरित्र हे त्याग, एकपत्नीव्रत या सारख्या गुणांनी भरले असूनही रामाला त्याच्या आयुष्यात दु:ख जास्त भोगायला लागले. पण कृष्णावताराच्या बाबतीत मात्र सगळ्या लीलांमध्ये रममाण होऊनही तो मात्र या सगळ्यांतून विरळा राहिल्याचे दिसते.

"माना मानव वा परमेश्वर मी स्वामी पतितांचा भोगी म्हणूनी उपहासा मी योगी कर्माचा" असं गदिमा उगाचच नाही लिहून गेले. गीतेसारखं भलमोठं तत्वज्ञान सांगणारा, आपल्या उपस्थितीनेही पांडवांच्या पक्षात विजय आणणारा, 16 हजार नारींचा नाथ बनून त्यांची दृष्ट नरकासुराच्या कैदेतून सुटका करणारा श्रीकृष्ण इतक्या दैवी शक्तींनी युक्त असूनही तो आपल्यातलाच एक वाटतो. म्हणूनच आपल्याला सगळ्या लीलांमध्ये, भोगामध्ये रमलेला कान्हा मात्र 'मी कर्मयोगी आहे'. असे सांगतानाही आपणाला आश्चर्य वाटत नाही. कारण तो एक पूर्णपुरुष आहे.

कृष्ण एक मोठं रसायन आहे. एकीकडे आपल्या बाललीलांनी आपण सामान्य असल्याचे दर्शवताना कंसाने पाठवलेल्या प्रत्येक शक्तिशाली व दृष्ट राक्षसांचा वध तो किती लीलया करतो. आपल्यासारखाच लहानपणी चोरून लोणी खाणारा नटखट कान्हा जेव्हा सगळ्या गोकुळवासियांच्या डोक्यावर गोवर्धनाचे छत धरतो, त्यावेळी त्याचे देवत्व असामान्यत्व समोर येते.

कृष्णाला किती उपमा, नाव किती तशी त्याची रूपेही किती? पाळण्यात पाय हलवणारा यशोदेचा 'लाल' दुडुदुडू धावणारा गोपिकांचा 'कान्हा', राधेचा 'श्याम', पेंद्या बलराम यांचा 'किश्ना' ही अन अशी कितीतरी रूपे अन नावे.



इंद्राच्या कोपापासून गावकऱ्याना वाचवणारा गिरीधर कितीतरी युक्ती प्रयुक्तींनी अज्ञानात असलेल्या त्या गोपजनांना जगण्याचं सार सोप्या भाषेतून, कृतीतून पटवून देतो. बायकांची ताक, दुध, लोणी या सारख्या साध्या ऐहिक गोष्टींवर असलेली आसक्ती सोडवण्यासाठी तो त्यांच्या घरचे लोणी, दूधदुभते चोरतो, मटकी फोडतो.

नंद राजाचा मुलगा असूनही त्याला या सगळ्या गोष्टी काय मिळत नसतील? पण आपल्याजवळच आपलं प्रिय इतरांनाही वाटावं, कोणी उचनीच असू नये सर्वांनी मिळून मिसळून राहावं हे आजच्या काळातलं 'समाजवादी' तत्वही श्रीकृष्णाने मांडलं. हे शिकवण्यासाठीच कृष्ण गोपालकाल्यापासून गवळणींच्या खोड्या करण्यापर्यंत सारी कृत्ये करत असावा.



आपल्या घर संसारात कष्ट करणाऱ्या गोपिकांना निखळ, शाश्वत आनंदाची प्राप्ती करून देवासाठी त्यांनी आपल्या मुरलीच्या नादाचे वेड लावले. रासक्रीडेत तर प्रत्येकीला कृष्ण पूर्णवेळ आपल्याशीच खेळत होता असे वाटत असे. ही अत्यानंदाची अनुभुती मिळणाऱ्या त्या किती धन्य असतील?

कृष्णाने त्यांना सगुणावर प्रेम करायला शिकवलं हे मान्य. पण जी स्त्री संसारी कामकाजातच अडकली आहे. तिला तिच्या प्रिय अशा मुलबाळ गुर वासरं यापासून बाजूला नेऊन सगुणाचे का होईना ध्यान करावयास लावणे हे सोपे काम नव्हते. तो चतुर होता चाणाक्ष होता, कर्तव्यनिष्ठ होताच अन वेळ पडल्यास वज्राहूनही कठोर होणारा होता.



नरकासुराच्या ताब्यात असणाऱ्या 16 हजार स्त्रियांशी लग्न करण्याचे धारिष्ट्य दाखवण्याचे सामर्थ्य फक्त कृष्णातच होते. कारण स्त्रीच्या अब्रूविषयी जिथे आजही 'काचेचे भांडे' वगैरे उपमांनी, तिच्या न केलेल्या चुकीमुळेही आयुष्यभर जिला दुःख भोगावे लागते, त्यावेळी नरकासुराकडे इतके दिवस बंदिवान असणाऱ्या स्त्रियांना तर त्यांच्या घरची दारे केव्हाच बंद झाली असतील? अशावेळेस त्यांच्यासमोर आत्महत्येशिवाय पर्याय राहिला असता का? म्हणूनच त्याने इतक्या स्त्रियांशी केलेला विवाह हा त्याचा भोगीपणा नसून त्यांना दिलेली जगण्याची संधी ठरते.

'कृष्णशिष्टाई' म्हणून प्रसिद्ध असणारे कृष्णाचे सभेतील वक्तव्य मुळातूनच अभ्यासव्यासारखे आहे. त्याने सत्याचा योग्य पक्ष घेताना त्याची कारणमीमांसा करतानाच कौरवांना त्यांच्या चुका सुधारण्याची संधीही देऊ केली होती. शिशुपालाचा वध करण्याआधीही त्याचे 100 अपराध कृष्णाने पोटात घातले होते. समोर स्वतःचे आप्त दिसल्याने युद्धभूमीत अस्वस्थ झालेल्या अर्जुनाला समजावतानाच 'मी युद्धात शस्त्र धरणार नाही' हा स्वतः केलेला 'पण' ही तो मोडण्यास

तयार झाला.

सांदिपनींच्या आश्रमात शिक्षण घेताना इतरांप्रमाणेच त्यांनी गुरुगृही काम केले व शेवटही एका सामान्य माणसाप्रमाणे मृत्यू पत्करून आपले अवतार कार्य संपवले. त्यामुळेच तो देव की मानव या वादात अडकण्यापेक्षा त्याने दिलेली शिकवण अंगिकारली तर आपला 'नारायण' व्हायला उशीर होणार नाही.

जन्माष्टमी व्रताचे महत्त्व

---



1. अष्टमीचे दोन प्रकार आहेत- पहिला जन्माष्टमी आणि दुसरा जयंती. यात केवळ पहिली अष्टमी आहे.
2. जो व्यक्ती जन्माष्टमीचे व्रत करत नाही तो मनुष्य जंगलात साप आणि वाघ बनून राहतो असे स्कंद पुराणात सांगितले आहे.
3. कलियुगातील भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या अष्टमीत 28 व्या युगात देवकी पुत्र श्रीकृष्ण जन्मले होते असे ब्रह्मपुराणात सांगितले आहे.
4. दिवसा किंवा रात्री कलामात्र रोहिणी नसेल तर विशेषतः पौर्णिमेच्या रात्री हे व्रत करा.
5. श्रावणात शुक्ल पक्षात कृष्ण जन्माष्टमीचे व्रत जो मनुष्य करत नाही तो क्रूर राक्षस होतो. केवळ अष्टमीच्या तिथीलाच उपवास करण्याचे सांगण्यात आले आहे. ती तिथी रोहिणी नक्षत्रात येत असेल तर 'जयंती' नावाने संबोधित केली जाईल असेही भविष्य पुराणात सांगितले आहे.
6. कृष्ण पक्षाच्या जन्माष्टमीत जर एकही कला रोहिणी नक्षत्रात असेल तर जयंती नावानेच संबोधित केले जाते. त्या दिवशी उपवास केला पाहिजे असे पुराणात लिहिले आहे.
7. विष्णुरहस्यादी मध्ये कृष्णपक्षाची अष्टमी रोहिणी नक्षत्रानेयुक्त भाद्रपद महिन्यात असेल तर जयंती नामवाली असे बोलले जाईल.
8. वसिष्ठ संहितेनुसार जर अष्टमी किंवा रोहिणी या दोन्हींचा योग अहोरात्रीत अपूर्ण असेल तर मुहूर्तात मात्र अहोरात्रीच्या योगात उपवास केला पाहिजे.
9. जे पुरूष चांगले आहेत ते जन्माष्टमीचे व्रत नक्कीच करतात. त्यांच्याकडे सदैव स्थिर लक्ष्मी असते. हे व्रत केल्याने त्यांचे संपूर्ण कार्य सिद्धीला जाते असे मदनरत्न स्कंद पुराणात म्हटले आहे.
10. विष्णू धर्मानुसार अर्ध्या रात्रीच्या वेळी रोहिणीत कृष्णाष्टमी असल्यास त्यावेळी कृष्णार्चन आणि पूजन केल्यास तीन जन्माच्या पापांचा नाश होतो.
11. जन्माष्टमी, रोहिणी आणि शिवरात्रीशिवाय तिथी किंवा नक्षत्राच्या शेवटी पारायण करा. यामध्ये केवळ रोहिणी उपवाससिद्ध आहेत असे भृगूने म्हटले आहे.